

बांगलादेशच्या जहाँगीरनगर विद्यापीठाशी सामंजस्य कराराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासमवेत डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर.के. कामत आदी.

# 'बांगलादेशी संशोधकांना सामंजस्य कराराचा लाभ'

कोल्हापूर टाइम्स टीम

'जैविक शास्त्रांच्या संशोधनात भारतातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी एक असलेल्या शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करारामुळे बांगलादेशच्या संशोधक, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल,' अशी भावना बांगलादेशमधील ढाका येथील जहाँगीरनगर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान व जनुकीय अभियांत्रिकी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अब्दुल्ला मोहम्मद शोहेल यांनी व्यक्त केली.

ढाका (बांगलादेश) येथील जहाँगीरनगर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात आज शैक्षणिक व संशोधकीय देवाणघेवाणीच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. शोहेल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

डॉ. शोहेल म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान तसेच सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभाग हे आधुनिक संशोधनामध्ये अग्रेसर आहेत. त्याचप्रमाणे जहाँगीरनगर विद्यापीठाचा बांगलादेशमध्ये बायोसेफ्टी व सिक्युरिटी, मॉलेक्युलर बायोटेक्नॉलॉजी या विषयांच्या संशोधनात मोठा लौकिक आहे.' यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, विद्यापीठाच्या इनक्युबेशन, इनोव्हेशन व लिंकेजीस कक्षाचे संचालक डॉ. आर.के. कामत, आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. ए.व्ही. घुले यांनी सामंजस्य करारांचा आढावा घेतला.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय रोईंग व कयकिंग (पुरुष) स्पर्धा रंकाळा तलाव येथे झाल्या. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, डॉ. पी.टी.गायकवाड आदी.

# शिवाजी विद्यापीठातर्फे आंतरविभागीय रोईंग स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय रोईंग व कयकिंग (पुरुष) स्पर्धा रंकाळा तलाव येथे पार पडल्या.

क्रीडा विभागाच्या वतीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी क्रीडा विभागाचे प्र. संचालक डॉ. पी.टी. गायकवाड होते.

यावेळी प्रा. विजय रोकडे, अॅड. वर्षा शिंदे, प्रा. सुजय खोपडे, शशिकांत दाभाडे, पृथ्वीराज सरनाईक यांच्यासह महाविद्यालयांमधील शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.